नि.दि.दा. क्र. ४५/२०२२
उत्तम वि. विलास व इतर
**CNR No.MHWS080003332022**

## <u>निशाणी क्र. २९ खालील आदेश</u>

प्रतिवादी क्र. ०४ च्या वकीलांनी सदरचा अर्ज नि.क्र. १९ वरील आदेशाची पुर्तता करण्याची परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरण आजरोजी दैनंदिन सुचीवर असून प्रतिवादी क्र. ०४ तर्फे त्याचे वकील नि.क्र. १९ वरील आदेशाची पुर्तता करण्यास तयार असल्याने त्यांनी सदरचा अर्ज करुन परवानगी मागितली आहे. याउलट प्रतिवादींच्या वकीलांनी केवळ "Opposed" असा विरोध दर्शविला आहे.

<u>०२</u> अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ०४ ने विहीत कालावधीत हजर न झाल्याने त्याच्याविरुध्द एकतर्फा आदेश दिनांक २२.०६.२०२२ रोजी पारीत केला होता. त्यानंतर त्याच्या वकीलांनी सदर आदेश दिनांक ०४.०२.२०२३ रोजी रद्द करुन घेतला होता. त्यानंतर आजरोजी त्याच्या वकीलांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मागील तारखेस आदेशाची पुर्तता करण्यास प्रतिवादी व वकील हजर नसल्याने त्यांनी परवानगीचा अर्ज दाखल केला आहे. जरी मागील तारखेस सदर आदेशाची पुर्तता करता आली नाही तरी दिवाणी प्रक्रिया संहित कलम १४८ व १५१ च्या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रकरणाची सद्यस्थिती बघता प्रतिवादीला योग्य संधी देण्याच्या उद्देशाने व प्रकरण गुणदोषावर निकाली निघावे याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. ०४ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ०४ यांना नियमानुसार नि.क्र. १९ वरील आदेशाची पुर्तता करण्याची परवानगी देण्यात येते.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.03.29 18:21:05 +0530

(योगेश द. कोईनकर)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

दिनांकः २९.०३.२०२३

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 29.03.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 29.03.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 29.03.2023 |